शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ४८/२०१८

| | |
|---|---|
| १. श्री. आण्णासाहेब रामगोंडा पाटील | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. प्राचार्य,नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, इचलकरंजी, जि.कोल्हापूर.<br>२. अध्यक्ष,दे.भ.बा.भा. खंजिरे शिक्षण संस्था, इचलकरंजी, जि.कोल्हापूर. | वि. प |

**तक्रारीचे स्वरूप :**

दे.भ.बा.भा. खंजिरे शिक्षण संस्था, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, इचलकरंजी, यांचेकडील सेवानिवृत्त शिक्षक श्री. आण्णासाहेब रामगोंडा पाटील यांनी दिनांक २८/०६/२०१७ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदरची नमूद तक्रार पुढीलप्रमाणे:-

१. डिसेंबर २००७ पासून वेतनवाढ बेकायदेशीर रोखणे.

२. मे, २००८ पासून संपूर्ण वेतन बेकायदेशीररित्या न करणे. (मे,२००८ ते सप्टेंबर,२००८)

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. महाविद्यालयाने जा. क्रं. एनसीआय /७२७/२००८ दि. १८/०२/२००८ अन्वये संचालक बी. सी. यु. डी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर यांना अनुचित वर्तनाबद्दल अधिनियम २१२ (१) नुसार तक्रारदार यांची एक वर्षाकरीता तत्कालीन प्राचार्यांनी वेतनवाढ रोखून धरण्याची किरकोळ शिक्षा दिलेबाबत कळविलेले आहे. त्यानंतर तक्रारदार यांना नियमानुसार एक वर्षानंतर रोखलेली वेतनवाढ देवून सेवानिवृत्ती दिनांकाअखेर सर्व वेतनवाढी दिलेल्या आहेत.

२. यातील तक्रारदार यांना माहे मे २००८ ते सप्टेंबर २००८ या कालावधीत महाविद्यालयाच्या वेतन देयकावर स्वाक्षरी करणेसाठी वारंवार लेखी व तोंडी कळवून देखील स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे तक्रारदार यांचे वेतन आदा केलेले नव्हते, परंतू नंतर तक्रारदारांचे विनंतीनुसार व वेतन देयकावर स्वाक्षरी केलेनंतर त्यांचे या कालावधीमधील वेतन अदा करण्यात आले आहे. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या व सोबत जोडलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, तक्रारदार यांनी तक्रार कालावधीमध्ये आपल्या सेवेत उध्द्ट वर्तन व कर्तव्यात वेळोवेळी कसूर केलेली दिसून येते. त्यामुळे सदर तक्रारअर्ज फेटाळण्यात यावा.

वरील तक्रार क्रं. १ व २ ही बाब तक्रारदाराच्या सेवेमधील १० वर्षापुर्वीची असून ते दि. ३०/०६/२०१७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवानिवृत्तीबाबतचा पेन्शन प्रस्ताव मंजूर झालेला आहे. यानंतर तक्रारदार यांनी जाणीवपूर्वक तक्रार समितीकडे तक्रार केली आहे. त्यामुळे त्यांचा तक्रारअर्ज फेटाळण्यात यावा.

**संस्थेचा अभिप्राय :**

उपलब्ध कागदपत्रांनुसार प्राचार्यांनी तक्रारीबाबत मांडलेले म्हणणे हे सत्य असून खरे व बरोबर आहे. तक्रारदार यांनी तक्रारीच्या कालावधीमध्ये आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा केलेला असून आपल्या सेवेमध्ये महाविद्यालय व संस्थेची बदनामी होईल असे वर्तन केले असल्यामुळे तत्कालीन प्राचार्यांनी किरकोळ शिक्षा दिलेली आहे. तसेच तक्रारदार यांनी नियमानुसार वेतन देयकावर स्वाक्षरी न केल्यामुळे त्यांना वेतन देय होवू शकले नाही असे दिसते. परंतु तक्रारदार यांच्या विनंतीनुसार वेतन देयकावर स्वाक्षरी घेवून वेतन आदा झालेले आहे. असे असतानाही तक्रारदार यांनी सदर तक्रार केली आहे. ही बाब १० वर्षापुर्वीची असुन सेवानिवृत्त होवून पेन्शन प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जाणीवपुर्वक तक्रार समितीकडे तक्रार केली आहे. त्यामुळे त्यांचा तक्रार अर्ज फेटाळण्यात यावा.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये दोन तक्रारी नमुद केल्या आहेत. डिसेंबर २००७ पासून वेतनवाढ बेकायदेशीर रोखणे आणि मे २००८ पासून संपूर्ण वेतन बेकायदेशीररित्या न करणे(मे,२००८ ते सप्टेंबर,२००८). यापैकी वेतन बेकायदेशीररित्या न करणे या तक्रारीबाबत तक्रारदार यांनी दिनांक २०/०१/२०२० च्या पत्राने, 'तक्रारीत दाखल असलेले सहा महीने बेकायदेशीररित्या वेतन महाविद्यालयाने आदा केले नव्हते नंतर ते मला सहा महिन्याने मिळाले आहे. यास्तव फक्त बेकायदेशीर रोखलेली वेतनवाढ मिळणेविषयी तक्रारीचे निराकरण करनेत यावे' अशी विनंती केली होती. तसेच समितीसमोर कथन केले होते. तसेच तक्रारदार यांचे थकीत वेतन आदा करण्यात आले बाबत समितीसमोर संस्था व महाविद्यालयाने लेखी व तोंडी सांगितले होते. सबब तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील थकीत वेतनाबाबतची तक्रार वगळण्यात आली.

तक्रारदाराने समितीसमोर आपली वेतनवाढ कोणतीही पुर्व सुचना न देता परस्पर रोखण्यात आली आहे असे सांगितले. महाविद्यालयाकडून दिलेल्या पत्रामध्ये महाविद्यालयाने जा. क्रं. एनसीआय /७२७/२००८ दि. १८/०२/२००८ अन्वये संचालक बी.सी.यु.डी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर यांना अनुचित वर्तनाबददल अधिनियम २१२ (१) नुसार तक्रारदार यांची एक वर्षाकरीता तत्कालीन प्राचार्यांनी वेतनवाढ रोखून धरण्याची किरकोळ शिक्षा दिलेबाबत कळविलेले आहे. त्यानंतर तक्रारदार यांना नियमानुसार एक वर्षानंतर रोखलेली वेतनवाढ देवून सेवानिवृत्ती दिनांका अखेर सर्व वेतनवाढी दिलेल्या आहेत असे म्हटले आहे.

संस्थेच्यावतीने देण्यात आलेल्या पत्रामध्ये तक्रारदार यांनी तक्रारीच्या कालावधीमध्ये आपल्या कर्तव्यात निष्काळजीपणा केलेला असून आपल्या सेवेमध्ये महाविद्यालय व संस्थेची

बदनामी होईल असे वर्तन केले असल्यामुळे तत्कालीन प्राचार्यांनी किरकोळ शिक्षा दिलेली आहे असे म्हटले आहे. संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये दि. १८/१२/२००७ रोजी रेफरन्स नं. एनसीआय/५२०/२०७/०८ च्या पत्राने तत्कालीन प्राचार्य श्री. ए. बी. पाटील यांनी तक्रारदार यांना रजिस्टर ए.डी.ने अनुचित वर्तनाबद्दल (Misconduct) खुलासा करणेबाबत नोटीस पाठविल्याचे दिसून येते. तथापी सदर पत्रामागे दि. १२/१२/२००७ रोजी टिपणी नोंद केल्याचे दिसून येते व त्यावर स्वाक्षऱ्या दिसून येतात. टिपणीमधील मजकूर खालीलप्रमाणेः-

'प्रस्तुत पत्राची मूळ प्रत श्री. ए. आर. पाटील अध्यापक राज्यशास्त्र विभाग नाईट कॉलेज, इचलकरंजी यांना (कॉलेज कार्यालयाकडील पत्र जा. क्र. एनसीआय/५२०/२०७/०८ दि. १२/१२/२००७ चे) अनुचित वर्तनबद्दल खुलासा करण्याबाबतची दि. १२/१२/२००७ रोजी सायं. ६:४५ वा. प्राचार्याचे केबीनमध्ये देत असता त्यांनी सदरचे पत्र स्विकारण्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यावेळी महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील कर्मचारी उपस्थित होते. त्यामुळे त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे.' असे नोंद केल्याचे दिसून येते.

दि. ०४/०१/२००८ रोजी तत्कालीन प्राचार्य श्री. ए. बी. पाटील तक्रारदार यांना एनसीआय/५८९/१०/२००७/०८ रोजी रजिस्टर ए. डी. पत्राने तक्रारदार यांचे अनुचित वर्तनाबद्दल अधिनियम २१२ मधील भाग १ नुसार आपली वेतनवाढ एका वर्षाकरिता रोखून धरत असलेबाबत कळविले आहे. सदरचे पत्र रजिस्टर ए. डी. ने पाठविल्याचे दिसून येते तथापी त्यावर Not claimed असा शेरा दिसून येतो. तत्कालीन प्राचार्य यांनी जा. क्र. एनसीआय/७२७/२०० दि. १८/१२/२००८ च्या पत्राने संचालक, म. व. वि. वि. मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना तक्रारदार यांचे अनुचित वर्तनाबद्दल २१२ मधील भाग १ नुसार एका वर्षासाठी वेतनवाढ रोखून धरत असल्याची किरकोळ शिक्षा दिल्याचे कळविले आहे.

तथापी परिनियम २१४ नुसार वाचले असता-

<u>S.214 : Authorities competent to inflict penalties:</u>

The power to inflict penalties on teachers of the Affiliated college/Recognised Institution will rest with the Governing Body of the affiliated college/Recognised Institution.

However, the power to inflict minor penalties such as Reprimand, warning or censure shall rest with the principal.

उपरोक्त तरतुदीमध्ये वेतनवाढ रोखून धरणेबाबतची शिक्षा प्राचार्यांच्या अखत्यारीत येत नाही तसेच याकामी संस्था व महाविद्यालय यांचेकडून दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये संस्थेने शिक्षेबाबत आदेश दिल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरची कार्यवाही तत्कालीन प्राचार्यांनी

त्यांच्या स्तरावर केल्याचे दिसून येते. सबब तत्कालीन प्राचार्यांनी वेतनवाढ रोखून धरण्याबाबतची केलेली कार्यवाही परिनियमांच्या तरतूदींना धरून नाही.

तक्रारदार यांनी डिसेंबर २००७ पासून रोखलेली वेतनवाढ आदा करणेकरीता मागणी करणारे पत्रव्यवहार या तक्रारीकामी समितीसमोर सादर केली आहेत. त्याचप्रमाणे तक्रारदार यांच्या वेतनवाढ पुनश्‍च चालू करणेबाबतच्या पत्राबाबत संस्थेने जा.क्र. डीबीकेएस/९/२०११—२०१२, दिनांक ०२/०५/२०११ च्या पत्राने प्राचार्य यांना रोखलेल्या वेतनवाढी संदर्भात काही त्रुटी असल्यास त्या पूर्तता करून घेवून तक्रारदार यांचे डिसेंबर २००७ ते डिसेंबर २००८ या कालवधीत कपात केलेली वेतनवाढ पुनश्‍च चालू करणेबाबत कळविलेची कार्यवाही केलेचे दिसून येते.

## आदेश

तक्रारदार यांच्या अर्जातील पहिल्या क्रमाच्या तक्रारीमध्ये तथ्य दिसून येते. त्यांची डिसेंबर २००७ ते डिसेंबर २००८ पर्यंत रोखलेली वेतनवाढ बेकायदेशीर आहे असे समितीच्या निदर्शनास येते. सबब संस्था व महाविद्यालयाने डिसेंबर २००७ मध्ये रोखलेली वेतनवाढ व त्या अनुषंगाने वेतनवाढीचा फरक तक्रारदार यांना दोन महिन्याच्या आत आदा करण्यात यावा. झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन कळविणेत यावे.

**दिनांक :** 20/03/2020

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**अध्यक्ष**
**(श्री. एस.पी.कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. ए.ए. कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. पी.डी. राऊत)**

**सदस्य**
**(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य**
**(श्री.एन.बी.गायकवाड)**

**सदस्य**
**(श्री.आर.बी.तुपे)**

**सचिव सदस्य**
**(श्रीमती ए.ए. कदम)**